D-SF-१०७

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रो. (डॉ.) सदानंद भोसले
एम.ए., पीएच्.डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

**संदर्भ : रासेयो/५४९/२०२३** **दि : २८ Dec २०२३**

प्रति,
मा.प्राचार्य,
**अशोका एज्युकेशन फाऊंडेशन अशोका कॉलेज ऑफ एज्युकेशन**
**पत्ता: सर्वे नं 1/8ब/2 प्लॉट नं 4 अशोक मार्ग अशोक नगर**
**वडाळा शिवार नाशिक ता.: नाशिक जि: नाशिक पिनकोड:**
**422006**

**विषय : २०२३-२०२४ राष्ट्रीय सेवा योजना स्वयंनिर्वाही विशेष शिबिर मान्यता देणेबाबत...**
**शिबिर संकल्पना - " युवकांचा ध्यास ग्राम- शहर विकास" अंतर्गत लोकसंख्या नियंत्रण जनजागृती**

महोदय/महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आपल्या महाविद्यालयास सन २०२३-२०२४ वर्षातील विशेष शिबिराकरिता २५ (**अक्षरी पंचवीस** )स्वयंसेवक शिबिरार्थी संख्या मान्य करण्यात आलेली आहे. त्यानुसार विशेष शिबिर आयोजनास आपल्या महाविद्यालयास प्रती स्वयंसेवक शिबिरार्थी रु. ७००/- प्रमाणे २५ स्वयंसेवक शिबिरार्थी संख्येकरिता रू. १७५०० अनुदान मंजूर करण्यात आलेले आहे. मंजूर अनुदानापैकी ७०% अनुदानाचा प्रथम हप्ता आपल्या रासेयो खात्यावर इ सी एस/एन ई एफ टी द्वारे वर्ग करण्यात येईल.

आपल्या प्रस्तावास अनुसरुन रासेयो विशेष शिबिरास दि. ११ Jan २०२४ पासून १७ Jan २०२४पर्यंत मु. JALALPUR ता. NASHIK (Corporation Area) जि. NASHIK या ठिकाणी आयोजन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्र. रासेयो-२०१४/प्र.क्र. ४२/१४/साशि-७, दिनांक: ०६/०९/२०१४, (शासन निर्णय क्र. २०१४०९०६१६४२०२३००८) व शासन निर्णय क्र.रासेयो-२०१७/प्र.क्र.८४/१७/साशि-७, दिनांक: २६/०९/२०१७, (शासन निर्णय क्र. २०१७०९२६१५५१५८४४०८) परिपत्रकानुसार महाराष्ट्र राज्यातील सर्व विद्यापीठांमधील रासेयो संलग्नीत महाविद्यालयांमधील स्वयंसेवकांकरिता कृती आराखड्यानुसार उपक्रम राबवण्यात यावेत. याकरिता सरपंच, पंचायत समिती, ग्रामविकास अधिकारी, तलाठी व तहसीलदार इ. शासकीय अधिकारी/यंत्रणा यांची मदत घ्यावी. तसेच विद्यार्थी स्वयंसेवक व स्थानिक गावकरी यांच्या एकत्रित सहकार्याने विविध प्रकारचे उपक्रम विशेष शिबिराच्या कालावधीत मोठ्या प्रमाणात व्हावेत ही अपेक्षा आहे.ह्या परिपत्रकाद्वारे जाहीर केलेल्या नियमावलीनुसारच आपले रासेयो शिबिर आयोजित करणे बंधनकारक आहे. शिबिरास वर्तमानपत्र, ट्विटर, फेसबुक, य्युटूब, इंस्टाग्राम, इतर सामाजिक माध्यमाद्वारे योग्य त्या सदरातून प्रसिद्धी द्यावी.

शिबिर संकल्पना - स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत " युवकांचा ध्यास ग्राम- शहर विकास" संकल्पनेवर पुढील प्रमाणे उपक्रम राबवण्यात यावेत.

१. लिंगभाव संवेदनशीलता जाणीवजागृती २. नदी स्वच्छता/जलस्रोत स्वच्छता व वृक्षारोपण ३. लोकशाहीतील सहभाग आणि मतदार जनजागृती
४. प्रधानमंत्री जन-धन व विमा योजना ५. ऐतिहासिक स्थळे संवर्धन व स्वच्छता अभियान ६. अन्न सुरक्षा जनजागृती
७. अपारंपरिक उर्जा / अक्षय उर्जा ८. पर्यावरण, जैवविविधता व अधिवास संवर्धन ९. मृदा व जल संवर्धन
१०. लोकसंख्या नियंत्रण जनजागृती

तसचे " **छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला ३५० वर्ष** " पूर्ण होण्याच्या पार्श्वभूमीवर महाविद्यालयांनी विशेष शिबिर आयोजन करताना छत्रपती शिवाजी महाराजांवर आधारित व्याख्यानांचे अनिवार्यपणे आयोजन करण्यात यावे

शिबिराचे हिशेब केंद्रीय पद्धतीने सादर करावेत. हिशेबाच्या कागदपत्रांबरोबर ‘ब’ फॉर्म सादर करणे आवश्यक आहे. शिबिरानंतर सविस्तर अहवाल १० दिवसांच्या आत पाठवावा. त्यासोबत शिबिरातील उपक्रमाची छायाचित्रे, बातमी व कात्रणे पाठवावीत. शिबिर अहवालासोबत शिबिरात केलेल्या श्रमदानाचे मूल्यमापन करुन पाठवावे. योग्य त्या अधिका-यांचा (सरपंच/तहसिलदार/गटविकास अधिकारी) दाखला जोडावा. त्यात केलेल्या कामाचा अंदाजे खर्च नमूद करावा. केंद्रीय लेखापरीक्षणाच्या वेळी देयकांसोबत सदर मान्यतापत्राची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

रासेयो महाविद्यालये व परिसंस्थांना सूचित करण्यात येत आहे की स्थानिक प्रशासन, जिल्हा प्रशासन, आपत्ती व्यवस्थापन, विद्यापीठ आणि महाराष्ट्र व केंद्र शासनाच्या नियमावलींना अनुरूप आणि त्यांच्या परवानगीने आपल्या स्तरावर रासेयो विशेष शिबिर आयोजित करण्यात यावे. तसेच आपत्ती व्यवस्थापनाच्या नियमानुसार एका ठिकाणी अधिक शिबिरार्थी एकत्रित येणार नाही याची दक्षता घ्यावी. या संदर्भात स्थानिक प्रशासनाचे नियम पाळावेत.

दत्तक गावाची निवड करताना महाविद्यालयांचे शिबिरार्थी शारिरीक अंतर राखून काम करतील आणि सुरक्षित निवासस्थानाबाबतची व्यवस्था गावातील पदाधिका-यांशी बोलून त्याची शहानिशा व खात्री करावी. विशेष शिबिर आयोजन करताना सहभागी स्वयंसेवकांचे दोन्ही पालकांकडून योग्य ते हमीपत्र महाविद्यालयाने घेणे गरजेचे आहे. तसेच शिबिर आयोजन करताना सर्व शासकीय नियमावलींचे पालन करणे अत्यावश्यक आहे. ह्या सर्व बाबींचे पालन व निर्धारण करण्याच्या अटीवर आपल्या महाविद्यालयास विशेष शिबिर आयोजन करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

आपणास शिबिरासाठी हार्दिक शुभेच्छा ! कळावे, ही विनंती.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

प्रो. (डॉ.) सदानंद भोसले
एम्.ए., पीएच् डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

*टिप : केंद्रिय लेखापरीक्षणाच्या वेळी मानधनाकरिता मान्यतापत्र जोडणे आवश्यक आहे.*

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना